
R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



एकूण पाने २० प्रती अंक ₹ ५

वर्ष ५३ वे, अंक ५वा, मुंबई जुलै २०२२ वार्षिक वर्गणी ₹ ५०

सन्माननीय बंधू भगिनी व विद्यार्थी मित्रांनो.

नमस्कार


प्रथमतः इयत्ता १०वी, १२वीच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींना त्यांच्या यशाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन व त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा!

दरवर्षीप्रमाणे मध्यवर्ती मंडळ १०वी, १२वी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या हुशार व गरजू विद्यार्थी-विद्यार्थिनींना शैक्षणिक शिष्यवृत्ती देत असते. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ हा काळ करोना महामारीचा काळ असल्यामुळे आम्ही पात्र विद्यार्थी-विद्यार्थीनींना शैक्षणिक शिष्यवृत्ती देवू शकलो नाही. याचा विचार करून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ म्हणजेच मार्च २०२२ मध्ये १०वी व १२वी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थीनींना मध्यवर्ती मंडळ एकूण शैक्षणिक शिष्यवृत्ती रु. दोन लाखाने वाढवून रु. चार लाखांपर्यंत देण्याचे कार्यकारी मंडळाने ठरविले आहे.

या आमच्या उपक्रमास आपल्याकडून भरभरून प्रतिसाद मिळावा व या शिष्यवृत्तीसाठीचे अर्ज आम्हाला संलग्न संस्थांकडून त्यांच्या शिफारसीसह ३१ जुलै २०२२ पर्यंत प्राप्त व्हावेत ही विनंती. जेणेकरून या शिष्यवृत्तीचे वाटप आम्हाला ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात करता येईल. हे सर्व पात्र विद्यार्थी-विद्यार्थीनी आपले भावी सभासद आहेत व मध्यवर्ती मंडळाकडून देण्यात येणारी ही अल्पशी भेट त्यांच्या भावी आयुष्यासाठी एक आठवण राहील.

आम्हाला कळविण्यास आनंद वाटतो की, आपल्या पूर्वजांनी अशा प्रकारच्या शैक्षणिक शिष्यवृत्तीचा पायंडा गेली ६० वर्षापासून पाडून दिलेला आहे. तोच पुढे नेण्याचा आमचा प्रयत्न आहे. आपल्या माहितीसाठी नमूद करू इच्छितो की, मध्यवर्ती मंडळाचा कायम स्वरुपी निधी हा समाजातील दानशूर व्यक्तींनी व पूर्वीच्या लाभार्थी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी दिलेल्या देणग्यामधून निर्माण झाला आहे. दानशूर व्यक्तींनी दिलेल्या देणग्यांमधून मध्यवर्ती मंडळ प्रतिवर्षी विविध विषयात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थीनीस पारितोषिकेही देत आलेली आहे. याचाही लाभ आपण आपल्या पाल्यांना योग्य प्रकारे विहित नमुन्यामध्ये (मार्कशीट व आवश्यक कागदपत्रांसहीत) भरून द्यावा ही विनंती.

यावर्षीपासून परदेशी वा देशांतर्गत उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना कर्जाऊ शिष्यवृत्ती योजना राबविण्याचे आम्ही ठरविले आहे. या शिष्यवृत्ती अंतर्गत कर्जाची कमाल मर्यादा रु. १ लाख असेल व कमाल ५ विद्यार्थी-विद्यार्थिनींना अशा प्रकारची शिष्यवृत्ती देण्यात येईल. या शिष्यवृत्तीचे अर्ज व त्यासंबंधीची पात्रता याची माहिती आपल्याला लवकरच आपल्या विभागातील संलग्न संस्थेमार्फत तसेच




अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाची मुखपत्रिका

**समाचार**

वर्ष ५३वे, अंक ५वा, जुलै २०२२

(फक्त सभासदांसाठी)

**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**संपादक**
**श्री. प्रभाकर अ. संत**

**कार्यकारी संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही

आजीव सभासद वर्गणी ₹ ५००

प्रति अंक ₹ ५

दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३

ई–मेल : aadrbm@gmail.com

संकेतस्थळ : www.adrbmmahim.in


## नर्मदा परिक्रमा पायी पूर्ण केलेले श्री. दीपक कुलकर्णी यांचा सन्मान



## रौप्य महोत्सवी अधिवेशन निमित्ताने महिला सभा







## नाशिक येथे श्री दुर्गादेवी व श्री दत्त मूर्तीचा प्रतिष्ठापना सोहळा






HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving 75+ Countries Worldwide
30+ YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
VdS CE
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire



## परमपूज्य श्रीरामकृष्ण क्षीरसागर स्वामी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने

# श्रीमद् देवी भागवत कथा आयोजन, श्री क्षेत्र माहुर येथे

**दिनांक ३१ ऑक्टोंबर २०२२ ते ६ नोव्हेंबर २०२२**

॥ समर्थ भक्त श्रीयुत मकरंद बुवा सुमंत (रामदासी) यांच्या
ओघवत्या व रसाळ वाणीतून श्रीमद् देवी भागवत ज्ञानयज्ञ ॥

## श्रीमद् देवी भागवताचे कथा नियोजन

- भागवताचार्य मकरंद बुवा रामदासी यांची श्री देवी भागवत कथा.
- कथा आयोजन श्री क्षेत्र माहुर येथे.
- उत्तम निवास व्यवस्था.
- दोन वेळेस सुग्रास भोजन, अल्पोपहार (चहा, कॉफी).
- संपुर्ण भागवत कथेत भक्तीचे वातावरण आपण ठेवूया.
- भागवत कथेचे शुल्क रुपये १७,०००/–
- नोंदणीस सुरवात १६ एप्रिल २०२२
- नोंदणी करतेवेळी रुपये १०,०००/– भरणे आवश्यक
- मर्यादित जागा आहेत.
- भाविकांनी स्वखर्चाने नियोजित ठिकाणी यायचे आहे.


PhonePe
ACCEPTED HERE
Scan & Pay Using PhonePe App

or Pay to Mobile Number using PhonePe App
9930513261
Chinmay Kulkarni

卐 श्री क्षेत्र माहुर 卐

माहुर हे क्षेत्र रेणुका देवीच्या सान्निध्याने पवित्र झालेले असून हे शक्तीपीठ आहे. माहुर हे गाव ३० - ३५ हजार लोकवस्तीचे असून लहान आहे. लहान गावाच्या मानाने हॉटेल्स उत्तम आहेत. बऱ्याच खोल्यामध्ये AC ची सुविधा आहे. भक्तांच्या निवासाची व्यवस्था ४ हॉटेल्स मध्ये विभागुन केलेली आहे. सर्व हॉटेल्स २ मजल्यांची आहेत. जिन्यांची चढ उत्तार अपरिहार्य आहे. कृपया याची नोंद घ्यावी.

टिप : माहूरच्या प्रवासासंबंधी सूचना लवकरच देण्यात येतील.



**संपर्क : माया कुळकर्णी – 8451941963**

संस्थेच्या वेबसाइटवर कळविण्यात येईल. अशा प्रकारची कर्जरूपी शिष्यवृत्या वेगवेगळ्या अभ्यास क्रमांसाठी असतील व त्याचा विचार प्रथम येणाऱ्या अर्जांना प्राधान्य देण्यात येईल. या अर्जावर निर्णय घेण्याचा अधिकार हा अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळास असेल व त्यांचा निर्णय अंतिम असेल याची नोंद घ्यावी.

सर्व संलग्न संस्थांना विनंती की, त्यांनी वरील दोन शैक्षणिक सहाय्य योजनेचा लाभ त्यांच्या सभासदांना मिळवून द्यावा. अर्जदाराचे पालक त्या विभागातील व मध्यवर्ती मंडळाचे सभासद असणे आवश्यक आहे.

परीषद – आपली बडोदे संस्था दि. १२ व १३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या अखिल भारतीय परिषदेसाठी उत्साहाने कामास लागली आहे. बडोदे संस्थेचे पदाधिकारी व मध्यवर्ती मंडळाचे पदाधिकारी संयुक्तरीत्या संलग्न संस्थांना भेटी देऊन परिषदेसंबंधी अवगत करत आहेत व त्यांच्याकडून या रौप्य महोत्सवी परिषदेकरीता सहाय्य व मार्गदर्शन याची विनंती करीत आहे.

या दृष्टीने आपले अध्यक्ष श्री. विलास जोशी, बडोदा संस्थेचे अध्यक्ष श्री. नितिन शहापूरकर, परिषदेचे संयोजक मिलिंद सरदेशमुख व डोंबिवली संस्थेचे अध्यक्ष श्री. जे. के. जोशी, श्री. अरविंद हस्तेकर यांच्यासह मी स्वतः व इतर यांनी आतापर्यंत डोंबिवली, कल्याण, पुणे, नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद या संस्थांना भेटलो आहोत व सर्वांचा प्रतिसाद अतिशय उत्साहवर्धक आहे. या सर्वांनी बडोदा परीषदेसाठी जास्तीत जास्त प्रतिनिधी पाठविण्याची व आर्थिक निधी जमवून देण्याचे वचन दिले आहे, त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

पुढील काळात आम्ही सर्वजण बेळगाव, हैद्राबाद, इंदोर, कराड, लातूर, नांदेड या संस्थांनाही भेटी देणार आहोत.

आपल्या सर्वांचे सहाय्य व आशिर्वाद मिळोत व आपण सर्वजण मिळून रौप्य महोत्सवी अधिवेशन भव्यरित्या दिमाखात साजरे करू.

**प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

# धरी रे मना धीर धाकाशी सांडी ।

## स. भ. श्री. मोहनबुवा रामदासी

मनुष्याच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंत अनेक संकटांना त्यास तोंड द्यावे लागते. सततच्या अशा येणाऱ्या संकटांमुळे एक वेळ अशी येते की मनुष्य खचून जातो, अनेकदा सततच्या अपयशाने खचून प्रयत्न सोडून देतो तर काही दुर्दैवी घटनेत आत्महत्येचा मार्ग स्विकारण्यापर्यंत टोकाचे पाऊल तो उचलतो. आपला मूळ स्वभाव हा संकटांपासून पळ काढण्याचा असतो. आपला जीव वाचवणे हे त्या मागचे कारण आहे. करोडो वर्षांच्या उत्क्रांतीतून मानवाने आपला जीव अनेक संकटातून वाचवला व आपली प्रजाती जपली त्यामुळे पळून जाणे, संकटांना घाबरणे व येणाऱ्या संकटाची भिती वाटणे हे स्वाभाविक आहे. अनेकदा तर आपली संकटे कल्पित असतात. मनाच्या कल्पनेतून तयार झालेल्या संकटांनाही आपण खूप घाबरतो व हातपाय गाळून बसतो.

**मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे । मना बोलणे नीच सोशीत जावे ।।**
**स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे । मना सर्व लोकांसि रे नीववावे ।।७।।**

मनाच्या श्लोकातून समर्थ म्हणतात : हे मना तू श्रेष्ठ अशाप्रकारचे धैर्य बाळग, अनेक प्रकारचे अपमान व नीच बोलणे सहन कर. हे करत असताना तु स्वतः मात्र नम्रपणे बोलत जा आणि अनेकांच्या मनाला सुखावेल असे आचरण ठेव

श्री समर्थांच्या काळाच्या दृष्टीने विचार केला असता आपल्याला थोडी कल्पना येऊ शकते की तो काळ किती निराशेचा असेल. हिंदु धर्मीयांवर अन्याय, अत्याचार होत होते, मुस्लीम शासक राज्यकर्ते होते. अनेक गोष्टींवर बंधने होती. समाज निराशेच्या गर्तेत होता. अशावेळी समर्थ आपल्याला श्रेष्ठ धारिष्ट्य धारण करण्याबाबत सूचवतात. ज्यावेळी आपण संकटांना धैर्याने तोंड देतो तेव्हा संकटांची भिती नाहीशी होतेच पण त्यातून मार्ग सापडण्याची शक्यता निर्माण होते. संकटास सामोरे जाण्यापुर्वी संकट जेवढे मोठे वाटते तेवढे ते प्रत्यक्ष समोर आल्यानंतर वाटत नाही हा आपल्यालाही अनुभव असेल. अनेकदा आपले मन संकटाबद्दल इतक्या विविध कल्पना करुन ठेवते की आपल्याला ते संकट भयंकर वाटते पण जेव्हा प्रत्यक्ष वेळ येते तेव्हा ते सामान्यच असते. अशाप्रकारे आपले मन आपल्याला बऱ्याचदा फसवते आणि संकटांपासून पळ काढण्यास उद्युक्त करते. अशावेळी मनाने धारिष्ट्य ठेवणे हेच उत्तम आहे असे दिसते.

पुढे समर्थ आपल्याला असे म्हणतात मना नीच बोलणे सोशीत जावे. व्यवहारात जे नीच बोलणे असते ते बोलणे समर्थांना अभिप्रेत नसावे. नीच बोलणे म्हणजे एखादा छोटा विचार अथवा स्वार्थी विचार. जगाचे कल्याण व्हावे हा विचार घेऊन समर्थांनी कार्य केले त्यामुळे फक्त स्वतःपुरता अथवा नजीकच्या भविष्यात लाभ देईल असा एखादा विचार वा भाषा सहन करावी असे समर्थ म्हणतात व पुढे म्हणतात

**स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे । मना सर्व लोकांसि रे निववावे ।।**

आपल्या समोर जेव्हा एखादी व्यक्ती छोटा विचार, स्वार्थी भाषा बोलत असेल त्यावेळी आपण ते नम्रपणे ऐकून घेतले पाहिजे व उलटसुलट उत्तर देऊन कलह करण्याऐवजी आपण नम्रपणे व शांतपणे आपली बाजू मांडली पाहिजे तसेच समोरच्या व्यक्तीचे मन जिंकून घेतले तर आपण जो विचार मांडत आहोत तो काही काळानंतर त्या व्यक्तीस समजू शकतो. जेथे कलह होऊ शकतो तो प्रसंग आपण अशाप्रकारे टाळू शकतो.

जर आपण दैनंदिन आयुष्यातील संकटांकडे पाहिले तर बरीच संकटे आपल्या मनातील भितीमुळे घेतलेल्या चुकीच्या निर्णयातून उद्‌भवलेली असतात आणि बरीचशी नम्रपणा न बाळगता विवादात पडल्यामुळे उद्भवलेली असतात. समर्थांनी सुचवलेल्या मार्गाने आपण गेलो तर संकटे निर्माण होणार नाहीत आणि झालीच तर त्यांना धैर्याने तोंड देता येईल.

**स. भ. श्री. मोहनबुवा रामदासी**
(कार्यकारी अध्यक्ष)
आनंदी - नारायण कृपा न्यास, खातगाव ता. कर्जत जि. नगर. मोबाईलः ९१४६८५५६९१

# व्यासपौर्णिमा (गुरुपौर्णिमा) आषाढ शुद्ध पौर्णिमा

**सौ. स्मिता देशपांडे** (मो. : ९४२२५३३६५६)

आषाढातील सर्वात महत्त्वाचा दिवस म्हणजे आषाढशुद्ध पौर्णिमा किंवा गुरुपौर्णिमा हा आहे. या दिवशी व्यासपूजा करण्याची प्रथा आहे. भारतीय संस्कृतीची मूळ संकल्पना आणि पुढची जोपासनी व्यास महर्षिंनी केली. व्यासांनी महाभारत हे श्री गणेशाकडून (गणपतीकडून) चारधामे यात्रेतील बद्रिनाथ येथील व्यास गुंफेत

लिहून घेतले असे म्हटले जाते. गुरू म्हणजे मोठा ज्ञानदानाच्या मार्गाने जीवनात योग्य दिशा दाखविणारा, मार्गदर्शक, म्हणून अशा गुरूंचे पूजन गुरूपौर्णिमेस केले जाते. गुरूला वयाची मर्यादा नसते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे श्रीकृष्णाचे बालपणी गोकुळात लोकांना भक्त करून त्याने गोवर्धन पर्वत उचलला आणि एकतेचे बळ लोकांना पटवून दिले, शिकविले.

जरासंधाच्या आक्रमणामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी त्याने मथुरा सोडून द्वारकेकडे पलायन केले आणि जीवनात कधी कधी माघार घेणे आवश्यक असते हे दाखवून दिले. बालपणीचा मित्र सुदामशी असलेले नाते हे मैत्री कशी असावी हे शिकवते तर कुरुक्षेत्रावर श्रीकृष्णाने सांगितलेली 'भगवद्गीता' संपूर्ण मानव जातीला मार्गदर्शक ठरली आहे.

गुरू शिष्याच्या परंपरेचा गौरव करणारी आपली संस्कृती आहे. त्यामुळे हा सण आपण साजरा करतो. या दिवशी गुरूंना वंदन करून त्यांचा गौरव केला जातो. व्यास पौर्णिमेच्या दिवशी ॐ नमोस्तुते ते व्यास विशालबुद्धे अशी प्रार्थना करतात. आपल्या देशात रामायण, महाभारत काळापासून गुरू-शिष्य परंपरा चालत आलेली आहे.

गुर्रुर ब्रह्मा, गुर्रुर विष्णू, गुरुदेवो महेश्वराः। गुरू साक्षात परब्रह्म, तस्मै श्री गुरुवे नमः।।

अशी प्रार्थना केली जाते. ही विद्या गुरुकडून घेण्यापूर्वी केली जाते. गुरू हा ज्ञानी, निःस्वार्थी, जीवनाचा वाटाड्या, मार्गदर्शक असतो. तो भक्ताला परमेश्वराचे दर्शन घडवून मोक्षाचा मार्ग दाखवतो. तो पौर्णिमेचा प्रकाश, ज्ञानाचा सागर असतो.

संत ज्ञानेश्वरांचे गुरू - निवृत्तीनाथ, संत एकनाथांचे गुरू - जनार्दन स्वामी, समर्थ रामदासांचे गुरू - कल्याणस्वामी, संत नामदेवांचे गुरू - विसोबा खेचर, भगवान श्रीकृष्णांचे गुरू - सांदीपनी, अर्जुनाचे गुरू - द्रोणाचार्य व भगवान श्रीकृष्ण अशी गुरुशिष्यांची परंपरा भारतीय संस्कृतीत होऊन गेली. गुरूंबद्दल आदराची भावना या दिवशी प्रकट केली जाते. महर्षी व्यासांसारखे गुरू आजपर्यंत झाले नाहीत. त्यांना आद्य गुरू मानतात. महाभारत हा महान ग्रंथ त्यांनी लिहिला त्यात राजनीती कशी असावी याचे अलौकिक व विद्वतापूर्ण विचार मांडले आहेत.

आपण ज्यांच्याकडून विद्याप्राप्त करतां. त्या विद्येच्या बळावर आपण आपल्या कुटुंबाचा, समाजाचा राष्ट्राचा उद्धार करतो. अशा गुरूंचा मान ठेवणे त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे, आदर व्यक्त करणे हे आपले आद्य कर्तव्य असून महाभारतापासून अशी प्रथा रूढ झाली आहे. गुरू म्हणजे ज्ञानाचा सूर्य, प्रेमाचा महासागर, दया, क्षमा, शांतीचा हिमाचल, महामेरू अशा गुरूंचे स्मरण, पूजन म्हणजे सत्यांचे ज्ञानांचे पुजन होय.

सम्राट सिकंदराला विश्वविजयाची आस होती. ग्रीसमधील प्रसिद्ध तत्त्ववेत्ता ॲरिस्टॉटल याचे गुरू होते. गुरू-शिष्य अरण्यातून चालताना रस्त्यात एक खाडी आली. पाण्याचा प्रवाह जोरदार व खाडी खोल होती. ॲरिस्टॉटलला खाडी पार करण्यासाठी सिकंदराने अडवले. परंतु खाडी आधी कोणी पार करावी यावर त्यांचा वाद सुरू झाला. तेव्हा सिकंदर ऐकेना त्याने प्रथम खाडी पार करण्याचा हट्ट केला. तेव्हा ॲरिस्टॉटल म्हणाले, ''मी तुझा गुरू आहे. तू माझ्या अगोदर जाणे हा माझा अपमान आहे नाही का?'' त्यावर सिकंदराने गुरूंना साष्टांग नमस्कार केला आणि तो म्हणाला, ''गुरुदेव मी आपला अपमान कसा करेन खाडीत आधी उतरणे हे माझे आद्य कर्तव्य होते.'' ते ऐकून गुरू आश्चर्यचकीत झाले व त्यांनी विचारले कारण काय? त्यावर सिकंदराने उत्तर दिले की, ''गुरुदेव खाडीत पहिला जो जाईल तो बुडण्याची शक्यता अधिक होती. कारण त्याला पाण्याचा काहीच अंदाज नसेल. एक ॲरिस्टॉटल वाचला तर हजारो सिकंदर निर्माण होतील, पण सिकंदर वाचला तर कधीही एकही ॲरिस्टॉटल निर्माण करू शकणार नाही.'' अशी गुरूंची महती आहे.

# राम आकाशी पाताळी

**डॉ. देवीदास पोटे** (मो. : ९८२०३३२१२८)

**राम आकाशी पाताळी। राम नांदे भूमंडळी। राम योगीयांचे मेळी। सर्व कळी शोभतो।।**

**राम नित्य निरंतरी। राम सबाह्य अंतरी। राम विवेकाचे घरी। भक्तिवरी सावटे।।**

**राम मी पणे नातुडे। मौन घडे श्रुतीसी। राम आनंद रक्षण। संरक्षण दासांचे।।** – समर्थ रामदास

श्रीराम हे समर्थांचे उपास्यदैवत. पंढरपूरच्या विठ्ठलमूर्तीतही त्यांना श्रीरामाचेच रूप दिसले आणि येथे का उभा श्रीरामा'' असा प्रश्न त्यांनी विचारला. म्हणजे त्यांचे अवघे अस्तित्वच राममय झाले होते.

या अभंगात समर्थ म्हणतात, ''राम तिन्ही खंडात म्हणजे आकाश, पाताळ आणि भूमंडळ यात व्यापून राहिला आहे. राम हे परम भक्तीचे रूप आहे. चैत्न्याचे तत्त्व आहे. राम हवा असेल तर अविवेकाचे ठाणे सोडून विवेक, ज्ञान आणि भक्तीमय सत्त्वशील आचरण हवे. रामनामाचे वर्णन करताना श्रुतीही मौनावतात. राम भक्तांच्या सुखाची जपणूक करणारा आहे. त्याच्या सेवकांचा संरक्षणकर्ता आहे.''

रामाकडे जाण्यातल्या मार्गातला सर्वात मोठा अडसर म्हणजे 'मी'पणा वा अहंकार. जसजशी अहंकाराची मात्रा कमी होते तसतशी नम्रतेच्या वाटेवरून विवेकाची वाटचाल सुरू होते. रामाचा निवास भक्तीच्या घरी असल्यामुळे श्रद्धा आणि भक्ती यांचा योग्य मेळ घातला की 'राम' सापडतो. 'राम' नावाचा निरामय चैत्न्यरूप तत्त्वाच्या आपण अधिक जवळ जातो. 'राम'तत्त्वाची जाणीव बाह्य सगुण रूपात जशी होते तशीच ती अंतरंगातही होते. राम हे आयुष्याचे सार आहे. म्हणूनच आयुष्य कंटाळवाणे वा नकोसे झाले की ''आयुष्यात राम नाही'' असे म्हणतात.

राम हे खरंतर आपल्या अंतरंगातील आत्मतत्त्वाचेच रूप आहे. कृष्ण, हरि ही रामाचीच वेगेगळी रूपे आहेत. 'राम'मय चैतन्य अंगोपांगी सामावले की सर्व अरिष्टांचा विनाश होतो. राम हे नाम सर्वांना तारणारे आहे. 'राम'नामाचे वर्णन करताना श्रुतीही मौन होतात. 'राम' या निर्गुण तत्त्वाने घेतलेले सगुण रूप म्हणजे कौसल्येचा पुत्र रघुकुलटिळक श्रीराम. समर्थ म्हणतात.

**सगुणाचे आधारे। निर्गुण पाविजे निधारे।।**

समर्थांचा 'राम'मय प्रवास सगुणाकडून निर्गुणाकडे झाला आहे.

चारित्र्य, कर्तव्य, धर्मरक्षण, मर्यादा पालन हे रामचरित्राचे विशेष आहेत. रामभक्ती काही अंशी मूर्तीच्या रूपात योग्य असते. पण कर्मकांड, पूजा यांचा अतिरेक झाला की भक्तीचे मूळ विकी तत्त्वच दिशाहीन होते. रामनामाचे स्मरण हा भक्तीचा सर्वात सोपा मार्ग आरहे. रामनामाने दगड तरून सागरात सेतू बांधल्याची कथा सर्वश्रुत आहे. 'राम, राम' अशा अखंड नामजपाने वाल्याचा वाल्मिकी झाला. रामनामाने आपल्या आतील मोहाला बळी पडणाऱ्या 'वाल्या'चा अंत होतो आणि आपली 'वाल्मिकी'पणाच्या दिशेने वाटचाल सुरू होते.

'राम'तत्त्वाचे वर्णन करताना एका कवीने म्हटलंय,

**राम मर्यादांचे भान। राम कर्तव्याचा बाण**

**राम कर्तृत्वाचे नाव। राम आनंद निधान**

चराचरात भरून राहिलेल्या रामतत्त्वाचे अतिशय प्रलयकारी विवेचन समर्थांनी केले आहे. शब्दाशब्दात दाटून राहिलेल्या राममय अनुभूतीचा आपल्याला उत्कट प्रत्यय येतो. मन रामरंगात रंगून जाते.

# स्वातंत्र्योत्तर भारतातील बाह्य कर्ज

**डॉ. आशुतोष रारावीकर (मो. : ९९६९५०७४६१)**

आपण स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत आहोत. हा आर्थिक विकासाचाही उत्सव आहे. देशाच्या विकासामध्ये बाह्य अर्थात विदेशी किंवा परकीय कर्जाचेही योगदान असते. भारताचे परकीय कर्ज केवळ बहुपक्षी आणि द्विपक्षी आधारावरच उभे केले जाते. कर्ज काढताना दीर्घकाळाची मुदत आणि सवलतपूर्ण कर्जाच्या अटींना प्राधान्य दिले जाते. भारताचे बहुतांश कर्ज सामाजिक क्षेत्रे आणि पायाभूत सुविधांसाठी घेतले जाते. केंद्र शासनाच्या विद्यमान कर्ज व्यवस्थापन धोरणानुसार परकीय कर्जाची महत्तम मर्यादा ७% इतकी आहे. मार्च २०१९ च्या अखेरीस एकूण सार्वजनिक कर्जातील परकीय कर्जाचा वाटा ६.८% होता. म्हणजे, ही पातळी निर्धारित मर्यादेत राहिली. आपल्या विदेशी कर्जातील घटकांवर दृष्टिक्षेप टाकला असता असे दिसते की व्यापारी कर्जांचा वाटा सर्वाधिक आहे. त्यानंतर अनिवासी ठेवी, द्विपक्षीय आणि बहुपक्षीय कर्जांचा क्रम आहे. जसजसा देश विकसित होत जाईल, तशा त्याच्या सवलतपूर्ण साह्याच्या गरजा कमी होत जातात. २००६ – २०२२ या कालावधीत एकूण बाह्य कर्जातील सवलतपूर्ण कर्जाचा वाटा उत्तरोत्तर घटत गेलेला दिसतो.

आपल्या प्रमुख कर्ज निकषांवरून भारताचे बाह्य कर्ज सुरक्षित मर्यादेत असल्याचे दिसून येते. मार्च २०२२ अखेरीस भारताचे बाह्य कर्ज ६२०.७ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतके होते. बाह्य कर्ज–स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचे गुणोत्तर १९.९% होते. १९९१ मधील व्यवहारतोल आपत्तीनंतर भारताने बाह्य कर्ज व्यवस्थापनाबाबत अंमलात आणलेल्या तरलता, कर्जफेड क्षमता आणि शाश्वतता यावर भर दिलेल्या योग्य प्रकारच्या धोरणांमुळे कर्जपातळी मर्यादेत राहिली. दीर्घकालीन धोरण स्वमालकीच्या संसाधनाद्वारे सहज परतफेड करता येऊ शकेल असे शाश्वत बाह्य कर्ज उभे करणे हे होय. यामध्ये कमी खर्चाची आणि दीर्घ मुदतीची कर्जे, हेतू आणि मुदतीनुसार परकीय व्यापारी कर्ज पातळीवर देखरेख ठेवणे, तसेच परकीय व्यापारी कर्ज आणि अनिवासी ठेवींच्या धोरणाचे विवेकीकरण करणे यावर भर दिला जातो.

शासनाच्या बाह्य कर्ज धोरणात पुढील बाबींचा समावेश होतो.

* कर्ज बहुपक्षीय आणि द्विपक्षीय स्रोतांकडूनच घेतले जाते. * खर्च व जोखमी निम्न पातळीत ठेवण्याच्या उद्दिष्टान्वये धनकोंची, तसेच धनकोंद्वारे दिल्या जाणाऱ्या विविध पर्यायांची निश्चिती केली जाते. * संभाव्य उघड देयकांविषयी निर्बंधात्मक धोरण. * पुनर्गुंतवणूक आणि पुनर्वित्त धोरणातील जोखमी किमान पातळीत करण्याच्या दृष्टीने अंमलात आणावयाच्या क्रियाशील धोरणात्मक उपाययोजनांसाठी कर्जफेड अनुमानांचे साह्य होते.

भारताचे दीर्घ एक वर्षापेक्षा अधिक मुदतीचे कर्ज अल्पमुदतीच्या कर्जापेक्षा जास्त आहे. मार्च २०२२ अखेरीस एकूण बाह्य कर्जातील दीर्घ मुदतीच्या कर्जाचा वाटा ८०.४% इतका होता. अल्पमुदतीच्या कर्जामुळे परतफेडीवर आणि उपलब्ध निधीवर ताण येत असल्यामुळे त्यांचे प्रमाण किमान ठेवणे आवश्यक असते. कमी पातळीतील अल्पमुदतीची कर्जे आणि अधिक प्रमाणातील दीर्घ मुदतीची कर्जे अशा पद्धतीने कर्ज मुदतीचा आकृतिबंध गरजेचा असतो. आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधील व्याजदरांतील वाढ ही आणखी एक जोखीम असते. जर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील व्याजदरात वाढ झाली, तर परकीय कर्ज घेण्याच्या खर्चात वाढ होईल आणि जुन्या कर्जाचे नूतनीकरण करणे अधिक खर्चिक होईल.

अनेक कर्जांची एकत्र परतफेड करणे किंवा एकाच वेळी मोठ्या रकमांची परतफेड करणे टाळण्याकडे कर्ज व्यवस्थापन धोरणात भर असतो. एकत्रित कर्जफेडीचा ताण वित्तीय यंत्रणेवर पडतो आणि काही वेळा केवळ

जुन्या कर्जाची फेड करण्यासाठी कर्जाची पुनर्रचना करणे किंवा नव्याने कर्ज घेण्याची गरज भासते. त्यामुळे कर्जे घेतानाच त्यांच्या मुदतीचा आराखडा अशा पद्धतीने केला जातो की जेणेकरून वारंवार ताण न उद्भवता एकसंध व सुरळीत परतफेड करता येऊ शकेल.

उद्योगसंस्थांना अधिक गुंतवणूक आणि प्रकल्पांच्या व्यवहार्यतेसाठी प्रकल्पातील भांडवलखर्च किमान असायला हवा असतो. त्यामुळे, उद्योगसंस्थांना जगभरातील भांडवल स्वस्तात स्वस्त उपलब्ध व्हावे, हे परकीय व्यापारी कर्ज धोरणाचे उद्दिष्ट असते. जागतिक बाजारपेठेतून कर्जे घेण्यामुळे देशांतर्गत बचती आणि भांडवल निर्मितीस साह्य होते. तसेच, त्याद्वारे गुंतवणूकदारांची व्याप्ती वाढते आणि त्यात वैविध्य येते. शिवाय, परकीय खासगी व्यापारी कर्जाची मर्यादाही निश्चित होते. या सर्व बाबतीत परकीय व्यापारी कर्जांचे महत्त्वपूर्ण स्थान असते.

परकीय चलनात कर्जे घेतल्यामुळे विनिमय दरातील चढउतारांना तोंड द्यावे लागते. देशांतर्गत चलनाच्या अवमूल्यनामध्ये चलनाच्या जोखीम व्यवस्थापनाच्या अभावी ऋणकोंना वित्तीय अडचणी येऊ शकतात. शिवाय, व्यवस्थात्मक आणि स्थूल वित्तीय स्थैर्याच्या आवश्यकतेमुळे आणि मूलभूत बाबींशी निगडित नसलेल्या परकीय व्यापारी कर्ज प्रवाहातील प्रचंड चढउतारांमुळे परकीय व्यापारी कर्जप्रवाहाचे नियमन करण्याची आवश्यकता भासते. म्हणून ऋणकोंनी त्यांच्या परकीय चलनातील कर्जविषयक जोखमींचे व्यवस्थापन करावे. तसेच भारतीय कंपन्यांना त्यांच्या वित्तीय गरजापूर्तीसाठी एक पर्यायी आणि अतिरिक्त मार्ग या नात्याने आपली देशांतर्गत रुपयातील चलनाच्या कर्जाची बाजारपेठ विकसित व्हावी.

या अनुषंगाने रिझर्व्ह बँकेने अलीकडेच नवे दिशादर्शन जाहीर केले आहे. यात निवासी आणि अनिवासी नागरिक अशा सर्व वापरकर्त्यांना एकात्मिक सुविधा असलेल्या एकल पद्धतीत विलीन केले जाते. यामुळे वापरकर्त्यांना कोणतेही उपलब्ध साधन वापरून योग्य प्रकारे जोखीम व्यवस्थापन करण्याची अनुमती मिळते. तसेच, संभाव्य जोखमींच्या व्यवस्थापनाची सुविधा आणि परकीय चलनाचे अनुजात उपलब्ध करणाऱ्या अधिकृत वितरकांसाठीची प्रक्रिया सुलभ झाली आहे. यामुळे ऋणकोंसाठी जोखीम व्यवस्थापनाच्या सुविधेला प्रोत्साहन मिळेल आणि परकीय व्यापारी कर्जामध्ये वाढ होऊ शकेल.

*(लेखक रिझर्व्ह बँकेत संचालक पदावर कार्यरत असून लेखातील मते वैयक्तिक आहेत.)*

## योग : एक जीवनशैली

**माधव दामोदर देशपांडे, सी.ए.** (मो. ९८६९०१२०३६)

आपले माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आठ वर्षापूर्वी संयुक्त राष्ट्रसंघामध्ये दि. २१ जून हा जागतिक योग दिवस म्हणून घोषित करावा असा प्रस्ताव मांडला व जवळ जवळ सर्व १९३ देशांनी त्या प्रस्तावास मान्यता दिली. परंतु योग ही वर्षातून एक दिवस करण्याची क्रिया नाही, तर ती दररोज नियमाने करण्याची साधना आहे. आपण जेव्हा कोणत्याही दोन गोष्टी जुळून आल्या की योग जुळून आला असे म्हणतो, जीवनात वेगवेगळे योग येतात. ईश्वरभक्ति - भक्ति योग, ज्ञान ग्रहण - ज्ञान योग, विविध कर्मे - कर्म योग ह्या सर्व गोष्टी साधण्यासाठी सर्वात महत्त्वाचे असते ते आपले शरीर. यशरीर माध्यम खलु धर्म-साधनम्ल कोणतीही गोष्ट साध्य करण्यासाठी शरीर निरोगी असणे अत्यंत गरजेचे आहे आणि त्यासाठी पातंजल मुनिंनी सांगितलेला मअष्टांग योगय हा महत्त्वाचा मानला जातो.

आजच्या काळात जीवन खूप वेगवान झाले आहे व तंत्रज्ञान खूप झपाट्याने बदलत आहे. ह्या बदलांशी जुळवून घेताना संपूर्ण मानवी जग प्रचंड ताणतणावाखाली वावरत आहे. प्रत्येक व्यक्ति लहानापासून मोठ्यांपर्यंत मानसीक ताण घेऊन जीवन कंठीत आहेत व त्या मानसीक ताणांमुळे वेगवेगळ्या व्याधींनी ग्रस्त आहेत.

आधुनिक विज्ञान सुद्धा मानते की माणसाला होणारे सुमारे ८० टक्के आजार हे मनोकायीक (सायकोसोयॅटीक) आहेत व त्यावर परिणामकारक कायम स्वरुपी इलाज आधुनिक वैद्यक शास्त्रात (ॲलीओपाथी) नाहीत. ह्या सर्वांवर एकच उपाय आहे. तो म्हणजे अष्टांग योग (हठयोग). अष्टांग योगाची जी आठ अंगे सांगितली जातात- १) यम, २) नियम, ३) आसन, ४) प्राणायाम, ५) प्रत्याहार, ६) धारणा, ७) ध्यान, ८) समाधी त्यांचा दैनंदिन अभ्यास व्यक्तिचा शारिरीक मानसीक आणि आध्यात्मिक विकास घडवितो. ज्ञानेश्वर माऊलींनी योगाची व्याख्या ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात केली आहे.

शीत वेढावे। उष्ण पांघरावे। वृष्टिचिया असावे घरा आतु।
किंबहुना पांडवा। हा आग्नप्रवेशु नित्य नवा।
यातरेविण करावा तो योगु।।

माऊली पुढे म्हणतात की, तुमचे शरीर याला प्रारंभी विरोध करेल. ऐसे हितासि जें जें निकें ते सदाचि या इंद्रिया दुःखे। एऱ्हवी सोपे योगासारिखे काही आहे आणि त्यावर दृष्टांत देताना सांगतात

पाहें पां आयुष्याते अढळ करी। जें सरते जीवित वारी। तया औषधातें वैरी। काय जिन्हा न म्हणे।

म्हणून माऊलीने सांगितलेला सोपा उपाय योग प्रत्येक व्यक्तिने करावा.

योगाच्या प्राथमिक क्रिया शुद्धिक्रिया यम, नियम, आसन शरीरशुध्दी करतात. पुढील श्वसनाच्या क्रिया शरिरांतर्गत प्राणवायुची शुद्धी करतात व श्वास प्रश्वासावर नियंत्रण आणतात व हे श्वास प्रश्वासावरिल नियंत्रणाने मन स्थिर होण्यास सुरवात होते. व मनावर येणारे नियंत्रण ही त्या व्यक्तिसाठी जगातील सर्वात मोठी उपलब्धी आहे. कारण यमन एव मनुष्याणां, कारणं बंध-मोक्षयो। मन हेच तुम्हाल। बंधनात टाकण्यास किंवा मोक्षाप्रत जाण्यात सहाय्यभूत ठरते.

शरीर-मनाची शुध्दी व्यक्तिचे विचार बदलते व त्याचे सकारात्मक परिणाम होतात योगी श्री. अरविंद म्हणतात. योग साधनेने आपण प्रगती करतो. असत्यातून सत्याकडे, दुर्बलतेतून सामर्थ्यामध्ये, दुःख शोकातून आनंदामध्ये, बंधनातून स्वातंत्र्यामध्ये, मृत्यूतून अमरत्वामध्ये, अपूर्णतेतून पुर्णत्वामध्ये, आत्म विभाजनातून एकत्वामध्ये, मायेतून देवत्वामध्ये. थोडक्यात योग साधनेमुळे व्यक्तिची, सर्वांगीण उन्नती होते.

## घरच्या घरी- सोपे प्रथमोपचार

**वैद्य प्रशान्त अनन्त सुरु** (मो. ९८२२८८५९५२)

आम्ही नवी गाडी घेतली, त्यावेळी त्या सर्विस सेंटरने एक 'प्रथमोपचार पेटी' (First Aid kit) सोबत दिला. वेळप्रसंगी उपयोगी पडावा, म्हणून. मला जाणवलं, सध्याच्या वेगवान काळात प्रथमोपचाराची महत्ता साऱ्यांना जाणवू लागली आहे. या 'फास्ट फूड, फास्ट लाइफ'च्या जमान्यात हे अधिकच मनावर बिंबवले जाते आहे.

आमच्या लहानपणी बहुतेक घरात 'आजीबाईचा बटवा' असायचाच. त्यामुळे किरकोळ आजारांना घरच्या घरीच प्रथमोपचार केले जायचे. हळद, आंबेहळद, रक्तचंदन, तुरटी, सांबरशिंग, सुंठ, मिरे, पिंपळी, ओवा, जायफळ, ज्येष्ठीमध, कुड्याचे पाळ अशी बरीच सहज सोपी औषधे असायची. सध्याही काही सूज्ञ मंडळी 'प्रवासी औषधी संच' बरोबर बाळगतात. म्हणून मनात विचार आला की, 'घरच्या घरी सोप्या औषध

उपचारांची एक थैली – बटवा' आपण सांगितला तर....... म्हणून हा लेखन प्रपंच.

आज फ्यामिली डॉक्टर ही संकल्पना लोप पावते आहे की काय? अशा काळात या बटव्याची खरच गरज भासत आहे. सध्याच्या धकाधकीच्या दिनक्रमात जेवणाच्या वेळा, आहारातले पदार्थ आणि प्रमाण – सारेच बदलत जाते आहे. 'टू मिनिट्स कुकिंग ते टू मिनिट्स टू इट' अशी सगळी घाई, पळापळ, धांदल सर्वत्र दिसून येते.

पण त्यामुळे अपचन, अजीर्ण, करपट ढेकरा, मळमळ ,जळजळ, भूक मंदावणे, पोट जड होणे – वाटणे, अवेळी मलप्रवृत्ती होणे किंवा न होणे इथपासून तक्रारींची रांग लागत सामान्य जन आमच्याकडे येतात. काही जणांनी, बाजारात जाहिरातीतून अक्षरशः डोक्यात घुसवलेल्या विविधं औषधी माऱ्याचा भडिमार सहन केला असतो. त्याच्या अतिरेकी वापराने पचन संस्थेचा पार बोऱ्या वाजायची वेळ येऊन ठेपते. मग या अश्या औषध माऱ्याचा भोग भोगण्यापेक्षा घरगुती उपचार करुन पाहिले तर .... चांगले नाही का?

सर्वात पहिला आणि सर्वात सोपा उपाय म्हणजे शक्यतो जेवणाच्या वेळा – नियमित, आणि मर्यादित असायला हव्या. यासह जेवताना शक्यतो कोमट – गरम पाणी – सोसवेल तेवढेच गरम, प्यावे. त्यामुळे खाल्लेल्या अन्नाचे पचन सहज आणि लवकर होण्यासाठी मदतच होत असते. Gas – वात कमी होतो. (अर्थात गरम पाण्याऐवजी गरम चहा – किंवा कॉफी चालणार नाही बर का!)

जेवताना अन्न नीट चावून खावे. अन्न ताजे, गरम असावे. Microwave मधले गरम नव्हे. रसाळ असावे. पांचट – पाणथळ नाही. आणि सगळ्यात महत्त्वाचे – मोजके, नियमित अन्न घ्यावे. आवडले म्हणून बेहिशोबी अन्न सेवन नको. पचन संस्था उत्तम राखणे, घडवणे किंवा बिघडवण्याचा मार्ग हा ओठातून जिभेच्या प्रेमाने पोटात जातो. पोटातून त्याज्य भाग मल म्हणून बाहेर जातो. या पचनसंस्थेचा हा मार्ग मोकळा राहिला तर रस्ता जाम होत नाही. व्याधि होत नाहीत. नाहीतर काय – नसेल तर पोट साफ तर व्याधि अफाट ....

पचन नीट झाले नाही तर काही उपाय करावेच लागतील. त्याची सोपी उपचार पद्धती सांगतो. जेवण झाल्यावर सुपारी, बडीशेप, मावा, पान – तांबूल आणि बरेच काही तोंडात कोंबण्याची आवड असू शकते. त्यासाठी 'मुखशुद्धी' म्हणून एक मस्त आणि सोपा पदार्थ आणि त्याची कृती सांगतो. एका कढई मध्ये एक चमचा – साधारण ५ ग्राम साजूक तूप तापवावे. ते तूप तापले की त्यावर २ ते ३ ग्राम एवढीच हिंग पूड घालावी. तो हिंग फुलून येतो. मग त्यावर सुमारे ५० ग्राम एवढा ओवा घालून तो भाजावा. त्यावर सैंधव मीठ चवीपुरते घालावे. पाण्यात विरघळवून घातले तरी चालेल. किंवा लिंबाच्या थोड्या रसात देखील चालेल. हे मिश्रण छान भाजून डबीत भरून ठेवता येते.

जेवणानंतर यातल्या एक ते दोन चिमुटभर पावडरचा छोटा घास चावून खावा. वाटल्यास त्यावर थोडे कोमट पाणी प्यावे. याचेमुळे पोट फुगणे, दुखणे अपचन, करपट ढेकरा अश्या तक्रारी राहत नाहीत आणि वारंवार होणारही नाहीत. पोट साफ होण्यालाही मदत होईल.

एकवेळ करून तर पहा!

अश्याच प्रकारच्या सोप्या उपायांची माहिती द्यायचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. हं. एक पथ्य मात्र पाळायला हवे. आजाराची लक्षणे कमी झाली नाहीत, किंवा वाढू लागली तर मात्र घरीच उपाय करत बसू नका. तज्ञ व्यक्तीचा सल्ला वेळीच घ्या. घरचे उपचार कुठे पर्यंत करावेत आणि वैद्यकीय मार्गदर्शन कधी घ्यायला हवे याचे तारतम्य नक्की बाळगायला हवे. तस्मात् तूर्त येवढे म्हणेन –

घरच्या घरी करण्याजोगे सांगू सोपे उपचार ।
तारतम्य बाळगूनच करावेत हे प्रथमोपचार ।।

पुढील वेळी नवीन कल्पना.... तोवर स्वस्थ रहा, आणि मस्त जगा ...... शुभेच्छा.

## विलेपार्ले मुंबई येथील लोकमान्य सेवा संघाची शतक महोत्सवी वर्षातील त्रैवार्षिक निवडणुकीत श्री. उदय तारदाळकर यांना यश



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक या द्रष्ट्या लोकनेत्याच्या स्मृती पश्चात त्यांच्या नावाने स्थापन झालेली, **लोकमान्य सेवा संघ, विलेपार्ले**, ही सामाजिक-सांस्कृतिक-विशेष पुनर्वसन अशा क्षेत्रात दीर्घकाळ काम सादर करणारी मुंबई आणि महाराष्ट्रातील एक नामवंत अग्रेसर संस्था आहे.

लोकमान्य सेवा संघाची शतक महोत्सवी वर्षातील वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २६ जून २०२२ रोजीच्या निवडणूकित कार्याध्यक्षपदी श्री उदय तारदाळकर हे बहुमताने विजयी झाले.

कार्याध्यक्ष - श्री. उदय तारदाळकर, कार्योपाध्यक्ष - श्री आलोक हर्डीकर, कोषाध्यक्ष - श्री. महादेव भिडे, संघकार्यवाह - श्री. महेश काळे, संघकार्यवाह - डॉ. रश्मी फडणवीस. संघाच्या नव्या कार्यकारणीत एकूण १६ सदस्य आहेत.

श्री. उदय तारदाळकर ह्यांची सलग तिसऱ्यांदा कार्याध्यक्ष म्हणून निवड झाली. श्री. उदय तारदाळकर हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे तसेच विलेपार्ले संस्थेचे सदस्य आहेत. दूरदर्शन व आकाशवाणीवर तसेच विविध प्रसार माध्यमांमध्ये श्री. उदय तारदाळकर यांचे अर्थविषयक मार्गदर्शन व लेख प्रसिद्ध केले जातात. आपल्या समाचार मासिकांमध्ये आजची भारतीय अर्थव्यवस्था या विषयावर सुद्धा त्यांनी अनेक वेळा लेखन केले आहे. श्री. तारदाळकर यांचे अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छा!

## संलग्न संस्था वृत्त

**विलेपार्ले** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ विलेपार्ले व इनर व्हील क्लब ऑफ मुंबई, पार्लेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने व मे. एच. डी. फायर प्रोटेक्ट प्रा. लि. यांच्या सहकार्याने विनामूल्य वैद्यकीय चिकीत्सा शिबीराचे दि. २९ मे २०२२ रोजी संस्थेच्या हनुमान रोड येथील कार्यालयात आयोजित करण्यात आले होते. रक्तातील साखरेचे प्रमाण, अस्थिरोग, ई.सी.जी., स्त्रियांची स्त्रि रोग तज्ञाकडून तपासणी, नेत्र चिकित्सा, दंत चिकित्सा आदीची तपासणी करण्यात आली. या शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुमारे १२५ सभासदांनी याचा लाभ घेतला. तपासणीनंतर विनामूल्य औषध वितरणाची देखील व्यवस्था करण्यात आली होती. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत दाणी, कार्याध्यक्ष श्री. सदानंद घोटीकर, कार्यवाह श्री. प्रभाकर कुलकर्णी व महेश कुलकर्णी यांची उपस्थिती होती. शिबीर यशस्वी करण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल कार्याध्यक्ष श्री. सदानंद घोटीकर यांनी सर्वांचे आभार मानले.

**मध्यवर्ती कार्यालय** : १) अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ व सुश्रुषा रुग्णालय मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने १ मे कामगार दिन व महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून विनामूल्य वैद्यकीय शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तातील साखरेचे प्रमाण, अस्थिरोग, ई.सी.जी., स्त्रियांची स्त्रि रोग तज्ञाकडून कर्करोग तपासणी, नेत्र चिकित्सा आदीची तपासणी करण्यात आली. या शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुमारे १०० सभासदांनी व परिसरातील नागरिकांनी या शिबीराचा लाभ घेतला. २) दादर सांस्कृतिक मंच आणि अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १० जून २००० २२ रोजी संध्याकाळी सहा वाजता मध्यवर्ती कार्यालयातील सुसज्ज सभागृहात संगीतकार कौशल इनामदार यांचा सुगम संगीताची कार्यशाळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गाणे सादर करताना ते समजून कसं गाव, गाण्याचे शब्द आणि भाव यांची अचूक सांगड कशी घालावी, गाणं अधिक प्रभावशाली प्रभावीपणे कसे सादर करावे, गाण्याचे

तंत्र, सुर, ताल लय यांचे गाण्यातील बारकावे कसे ओळखावे अशा वेगवेगळ्या विषयावर सखोल मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. या बहारदार कार्यक्रमात सुमारे २०० संगीतप्रेमिंचा सहभाग नोंदवण्यात आला. या कार्यक्रमास संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी, विश्वस्त श्री. मिलिंद सरदेशमुख व सौ. वासंती काळे तसेच डोंबवली संस्थेचे श्री. श्रीकांत कानडे उपस्थित होते. या कार्यक्रमास दादर संस्कृतिक मंच या संस्थेच्या अध्यक्ष उत्तरा मोने यांनी मोलाचे सहकार्य केले. ३ ) मध्यवर्ती मंडळाच्या भाडेकरू केसमधील विजय : कोर्ट केस नं. ३/१५ श्री. मनोहर रामचंद्र वैद्य विरोधात देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ या प्रकरणात मा. न्यायालयाने मध्यवर्ती मंडळाच्या बाजूने निर्णय दिला. मा न्यायालयाचे बेलिफ यांनी रूम नंबर तीनचा ताबा माननीय न्यायालयाच्या आदेशानुसार श्री. मनोहर रामचंद्र वैद्य यांच्याकडून घेऊन रीतसर मध्यवर्ती मंडळास दिला. ही सर्व प्रक्रिया सुरू असताना मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास जोशी, विश्वस्त श्री. मिलिंद सरदेशमुख तसेच श्री. सदानंद घोटीकर, व्यवस्थापक श्री. विकास माने उपस्थित होते. तळमजल्यावरील जागा मंडळाच्या ताब्यात आली असून ॲड कै. माधवराव अनगळ यांनी केलेल्या प्रयत्नांना यश मिळत आहे. सर्व कार्यकारी मंडळाचे अभिनंदन!

**नाशिक : देशस्त ऋग्वेदी संस्था नाशिक आयोजित श्री दुर्गा देवी व श्री दत्त मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना सोहळा संपन्न –** नाशिक येथील तिळभांडेश्वर लेनमधील मंदिरात श्री दुर्गादेवी व श्री दत्त मूर्तींची प्राणप्रतिष्ठा दिनांक १७/६/२०२२ ते १९/६/२०२२ असा तीन दिवस सोहळा संपन्न झाला दिनांक १७/६/२०२२ रोजी सकाळी साडेआठ वाजता देवांची ग्राम प्रदक्षिणा सवाद्य मिरवणूक रथावर काढण्यात आली. मिरवणुकीत संस्थेचे सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी, महिला शाखेच्या महिला पारंपरिक वेशभूषेत उत्साहाने सामील झाल्या होत्या. सकाळी साडेनऊ वाजता मंगलचरणी गणपती पूजन हा कार्यक्रम तसेच दिनांक १८/६/२०२२ रोजी सकाळी नऊ ते पाच जल आदिवास, गृहस्थापना पर्याय हवंन धान्यादिवस असा कार्यक्रम होता. दिनांक १९/६/२०२२ रोजी सकाळी आठ ते एक देव प्रबोधन व मुख्य प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्तरांग हवं पूर्ण हूती असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता संस्थेचे अध्यक्ष श्री. मुकुंद नारायण कुलकर्णी व सौ. अलका मुकुंद कुलकर्णी यांच्या हस्ते श्री दत्ताची प्राणप्रतिष्ठा व श्री. मोहिनीराज एकनाथ कुलकर्णी व सौ. मंगला मोहिनीराज कुलकर्णी यांचे हस्ते देवीच्या प्राणप्रतिष्ठेचा कार्यक्रम संपन्न झाला. संपूर्ण धार्मिक कार्यक्रम वेदमूर्ती वासुदेव शास्त्री पैठणकर मनीष पैठणकर, पंकज उंदीरवाडकर यांच्या नेतृत्वाखाली परमपूज्य प्रातःस्मरणीय दत्तोपासक सिद्ध दिगंबर गणेश बाबांचे सहवास लाभलेले, दोन वेळा नर्मदा परिक्रमा पूर्ण केलेले श्री. विवेक दंडवते यांच्या हस्ते पूर्णाहुती संपन्न झाली, असा अतिशय शास्त्रोक्त पद्धतीने प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न झाला. मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष विलास जोशी, कार्याध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी, प्रसाद ठकार, मिलिंद सरदेशमुख तसेच ज्येष्ठ अभिनेत्री सौ. अनिता दाते व राष्ट्रीय कबड्डीपटू आदिती डोणगावकर आदी मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वश्री मुकुंद कुलकर्णी, हेमंत कुलकर्णी, मोहिनीराज कुलकर्णी, डॉक्टर अभय सुखात्मे, विकास कुलकर्णी, नरेंद्र कुलकर्णी, राजेंद्र खेडलेकर, अशोक कुलकर्णी, अवधूत देशपांडे आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले नाशिक शहरातील अनेक मान्यवर या सोहळ्यास उपस्थित होते.

**पुणे :** अखिल देशात ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ करीत असलेल्या शैक्षणिक कार्यास पौड रोड पुणे येथील संस्थेचे जेष्ठ सभासद श्री. अरविंद दत्तात्रय आचार्य यांनी संस्थेच्या २०२१-२०२२ वर्षाच्या शैक्षणिक कार्यास रुपये ६०००/- चा धनादेश संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी, मिलिंद सरदेशमुख, अरविंद हस्तेकर, नितीन शहापूरकर यांच्याकडे सुपूर्द केला. मध्यवर्ती संस्था करीत असलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना शैक्षणिक मदत व्हावी या हेतूने किमान दोन विद्यार्थ्यांचा शैक्षणिक खर्च भागवता येईल या उद्देशाने रुपये एका लाखाची देणगी देण्याचे प्रस्तावित केले. या देणगीच्या व्याजातून दरवर्षी दोन गरीब ज्ञातीतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक खर्चाचा भार उचलता येईल असे श्री. आचार्य यांनी सांगितले. हयातीनंतर देखील ही मदत सुरूच राहील याची तजवीज मी करणार आहे असेही श्री. आचार्य म्हणाले. श्री. अरविंद आचार्य यांच्या या दातृत्वाबद्दल संस्था ऋणी आहे.

**मध्यवर्ती पदाधिकारी यांच्या विविध संस्थांना भेटी :** अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे दिनांक १२ व १३ नोव्हेंबर २०२२ रोजी रौप्यमहोत्सवी राष्ट्रीय परिषद बडोदा गुजरात येथे आयोजित करण्यात आली आहे. या संदर्भात पदाधिकारी व सभासदांना मार्गदर्शन करण्यासाठी व संस्थांना भेटी देण्यासाठी श्री. विलास जोशी,

अध्यक्ष व श्री. प्रभाकर कुलकर्णी, कार्याध्यक्ष तसेच संस्थेचे विश्वस्त मिलिंद सरदेशमुख, सचिव प्रसाद ठकार यांनी नाशिक, पुणे, कोथरूड, डोंबिवली, कल्याण, अहमदनगर, औरंगाबाद आदी संस्थांना भेटी दिल्या व मार्गदर्शन केले.

**महिला सभा** : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाची दादर मध्यवर्ती कार्यालयात महिला सदस्यांची बैठक दि २९ जून २०२०० रोजी आयोजित करण्यात आली होती.

मध्यवर्ती संस्थेच्या परिषदेच्या सचिव सौ. रोहिणी तडवलकर यांच्या नेतृत्वाखाली गिरगाव, दादर मुंबई, ठाणे, डोंबिवली, कल्याण, कोथरूड, पुणे, अहमदनगर, नाशिक, आदी संस्थेच्या पदाधिकारी, सदस्य, उपस्थित होते; तसेच मध्यवर्ती संस्थेचे अध्यक्ष विलासराव जोशी, कार्याध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी, भैय्यासाहेब गंधे, विश्वस्त व समाचारचे संपादक मिलिंद सरदेशमुख, पुष्पा कुलकर्णी, अश्विनी नारविलकर, पार्ले संघाचे आनंद कुलकर्णी, यांनी देखील सभेत मार्गदर्शन केले. सभेची उत्तम व्यवस्था मॅनेजर श्री. विकास माने यांनी केली होती. दि १२ व १३ नोव्हेंबर २०२२ रोजी वडोदरा (गुजरात) येथे होणाऱ्या देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या रौप्य महोत्सवी परिषदेच्या कार्याची विस्तृत माहिती देण्यात आली.

**१० व १२वीच्या वर्गात उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन!** : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे समाजातील गरजू विध्यार्थी-विद्यार्थीनींना शैक्षणिक मदत/कर्जाऊ शिष्यवृत्ती दिली जाते. १० वी व १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक कार्यासाठी दिल्या जाणाऱ्या या मदतीसाठी ३१ जुलै २०२२ पर्यंत अर्ज मध्यवर्ती संस्थेच्या कार्यालयात पोहोचणे (स्थानिक संलग्न संस्थेच्या शिफारशीसह) आवश्यक आहे. शैक्षणिक मदतीसाठी अर्जाचा नमुना संस्थेच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. अर्जासोबत विद्यार्थ्यांनी १०वी/१२वी गुणपत्रिकेची प्रत, पुढील शिक्षणासाठी प्रवेश घ्यावयाचा आहे त्या संस्थेचे नावं व पत्ता, संलग्न संस्थेचे/सभासदाचे शिफारस पत्रासह अर्ज करावा. पत्ता :- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास रोड, माहीम, मुंबई ४०००१६. संपर्क : ०२२ २४३०२२७३/ २४३०७५७३ Email :- aadrbm@gmail.com, Web:- www.adrbmmahim.in

**विलासराव जोशी** — अध्यक्ष
**प्रभाकर कुलकर्णी** — कार्याध्यक्ष

## भावपूर्ण श्रद्धांजली

* देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, ठाणे संस्थेचे मान्यवर सदस्य **श्री. सुहास सावरगांवकर** यांचे दि. ७/६/२०२२ रोजी दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. सावरगांवकर यांचा संस्थेच्या सर्व कार्यक्रमात सक्रिय सहभाग असायचा. भावपूर्ण श्रद्धांजली

* देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ विलेपार्लेचे कार्यवाह **श्री. महेश दामोदर कुलकर्णी** यांचे दि. २६/६/२०२२ रोजी हृदयविकाराने दुःखद निधन. महेश कुलकर्णी हे अत्यंत मनमिळाऊ हसरे खेळते व्यक्तिमत्व होते. सर्व पार्लेकरांमध्ये त्यांच्या स्वभावामुळे सर्वांना प्रिय होते. आयटी क्षेत्रात तसेच अनेक नामांकित कंपन्या रिलायन्स, इन्फोसिस यामध्ये हार्डवेअर सेक्शन इनचार्ज म्हणून त्यांनी उच्च पदावर काम केले आहे. आय टी तज्ञ तसेच हार्डवेअर सल्लागार म्हणून ते सर्वांना ज्ञात होते. त्यांच्यामागे पत्नी अनया, मुलगा, सून, मुलगी व नातू असा परिवार आहे.आम्ही सर्व देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण परिवार त्यांच्या दुःखात सहभागी आहोत. भावपूर्ण श्रद्धांजली.

* अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे कार्यकारी परिषदेचे सदस्य तसेच देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, विलेपार्लेचे सदस्य **श्री. हेमकांत नारविलकर**, यांचे दि. ६/७/२०२२ रोजी दुपारी ०३.३० वाजता वृद्धापकाळाने निधन. भावपूर्ण श्रद्धांजली . समस्त अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ पदाधिकारी व सदस्य नारविलकर परिवाराच्या दुःखात सहभागी आहोत.

# जोडीदार निवडा

**वर पाहिजे**....................................................................................................

● नाव – **डॉ. सिद्धी अनिल आराध्ये,** जन्मतारीख – १३.१२.१९९५, ब्राह्मण पोट शाखा, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, जन्मवेळ – सकाळी ७.३५, राशी – सिंह, गण – राक्षस, नाडी – अत्यं, चरण – पहिले, शिक्षण – बी.डी.एस., नक्षत्र – मघा, योनी – उंदीर, गोत्र – भारद्वाज, उंची – ५ फूट ५ इंच. अपेक्षा – अनुरूप, वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी शाखेतील असावा. पत्ता – अनिल गोपाळराव आराध्ये : घर नं. ४६१४, १–अ गाताडे प्लॉट जुना कराड नाका मागे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर, संपर्क – ७३५०२९४७८९/८७६६५४१७१२

● नाव – **कु. स्नेहा धनंजय लोहोगावकर,** ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, शाकाहारी, जन्मतारीख – १७.०३.१९८९, वय ३३ वर्ण – गोरा सडपातळ, रास – कर्क, नक्षत्र – पुष्यचरण १ नाडी – मध्य, उंची –५.१, शिक्षण – सी. एस. एल. एल. बी. (C. S. LLB), नोकरी – खाजगी कंपनीत C. S. मुंबई मध्ये. आई वडील सेवानिवृत्त आहेत. १ भाऊ B.Sc / MBA असून मुबईत नोकरी करीत आहे. अपेक्षा – उच्चशिक्षित, सुसंस्कृत, शाकाहारी, निर्व्यसनी, अनुरूप. अधिक माहितीसाठी संपर्क – आई सौ. मधुरा ध. लोहोगावकर, मोबाईल नं. ९८६९०३९४६६

● नाव – **कु. गायत्री श्रीपाद थिटे,** पत्ता : ४७ए, बझार रोड, बांद्रा (प.), मुंबई–५०. दूरध्वनी : ९१४६९८३९१६. ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ. जन्म दिनांक : ०४ मे १९९४. गोत्र : भारद्वाज, वय : २८, उंची : ५ फूट ३ इंच, वर्ण : गोरा, शिक्षण : १२वी पास (इंग्रजी माध्यम), भाऊ/बहीण : नाही. अपेक्षा : स्वतःचे घर, आईवडिल असलेला परिवार मुंबईस्थित, कायम स्वरूपी नोकरी.

● नाव – **कु. अपूर्वा मोहन बहिरट.** ब्राह्मण पोटशाखाः देशस्थ ऋग्वेदी, भ्रमणध्वनी : ९८७०७१४७३०, ९८७०७५७००४, पत्ता : कांदिवली, मुंबई, जन्म तारीख/वेळ : ११.०७.१९९३, सकाळी ११.३५, जन्मस्थळ : नाशिक, उंची : ५ फूट, गोत्र : बादरायण, रास : मीन, नक्षत्र : रेवती, चरण : १, गण : देव, नाडीः अंत्य, मंगळ : नाही, वर्ण : गहू वर्ण, बांधा : मध्यम, शिक्षण :– B.com., नोकरी व ठिकाण – मुंबई, हुद्दा (पोस्ट) : Sr. Accounts Executive, अपेक्षा : प्रथमवर, उंची ५'४ ते ५'८. मुंबई पुणेस्थित प्राधान्य, कोणत्याही शाखेचा पदवीधर, स्वतःचे घर असावे, निर्व्यसनी, समंजस, मनमिळावू

**वधू पाहिजे**....................................................................................................

● नाव – **सौरभ धनंजय लोहोगावकर,** ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख – २६.०४.१९८४, गोत्र – अत्री, उंची ५.४, शिक्षण – बीएससी, एम.बी.ए. जन्मवेळ – रात्री ९.१३, जन्मस्थळ – पुणे, अपेक्षा – शाकाहारी, ग्रॅज्युएट, नोकरी करणारी, संपर्क – सौ. मधुरा लोहोगावकर मो. नं. ९८६९०३९४४६, पत्ता – फ्लॅ नं. ५०३, श्रद्धादीप को. ऑ. हौ. सो. जयानगर, दत्तपाडा, बोरिवली (पूर्व), मुंबई – ४०० ०६६


## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**लक्ष्मी नारायण बाग, बाळ गोविंदासमार्ग, माहीम, मुंबई–४०००१६. दूरध्वनी : ०२२–२४३०२२७३/ २४३०७५७६ ई–मेल : aadrbm@gmail.com संकेतस्थळ : www.adrbmmahim.in**

## मध्यवर्ती वधु-वर सूचक केंद्र

✻ ब्राह्मण उपवर वधु–वरांची तसेच घटस्फोटीत/पुनर्विवाह नावनोंदणी ✻

✻ वधू/वर नोंदणी माफक दरात (वार्षिक रु. ५००/–) ✻

✻ समाचार मासिकात विनामूल्य प्रसिद्धी ✻

✻ सर्वसोयींनी उपलब्ध वातानुकूलित मंगल कार्यालय ✻

✻ तज्ज्ञांचे मार्गदर्शन ✻

***(संस्थेचा सामाजिक उपक्रम आजच संपर्क करा)***



# ऋग्वेद भूषण - मुकुंद नारायण कुलकर्णी

**श्री. मुकुंद नारायण कुलकर्णी** यांचा जन्म बावी, तालुका-बार्शी, जिल्हा-सोलापूर येथे झाला. प्राथमिक शिक्षण बावीच्या जिल्हा परिषदेच्या शेती शाळेत आणि माध्यमिक शिक्षण बार्शी येथील सुलाखे हायस्कूल आणि बारावी पर्यंतचे शिक्षण सोलापूरच्या नार्थकोट हायस्कूल येथे झाले. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची. वडील भिक्षूकी करायचे. बारावीनंतर शिक्षण घेण्याची परिस्थिती नव्हती म्हणून शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी काही दिवस पाईप फिटर म्हणून वेस्टर्न इंडिया लिमिटेड या कंपनीमध्ये काम केले त्या कमाईतूनच डिप्लोमाचे शिक्षण पूर्ण केले. सोलापूर ब्राह्मण समाज सेवा संघ संचलित डॉक्टर चाटी अनाथ विद्यार्थी गृह येथे प्रवेश मिळाल्यामुळे शिक्षण घेता आले. त्यावेळी राहण्याची जेवणासहित फी रुपये २५/- इतकी होती. ही फी सुद्धा सोलापूर येथील डॉक्टर अंत्रोळीकर ट्रस्ट मधून मिळायची. अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ मुंबई व विद्यार्थी सहाय्यक मंडळ ठाणे यांच्याकडून आर्थिक मदत मिळत असे. या सर्व संस्था तसेच अनेक व्यक्तींनी आर्थिक मदत केल्यामुळेच शिक्षण घेता आले असे मुकुंद कुलकर्णी आजही नम्रपणे सांगतात. डिप्लोमा पूर्ण झाल्यानंतर ज्या कंपनीत फिटर म्हणून काम केले होते त्याच कंपनीत इंजिनिअर ते साईट इन्चार्ज पदापर्यंत पोहोचले. १९८० ते १९८९ अशी नऊ वर्षे उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, मद्रास, दुबई, कुवेत अशा विविध ठिकाणी काम केले. १९८९ नंतर महाराष्ट्रात स्थायिक व्हायचे म्हणून कुवेत येथील रु, ३०,०००/- ची नोकरी सोडून रिलायेबल ग्रुप ऑफ कंपनी येथे रु १४००/- पगारावर रुजू झाले. या कंपनीत काम करीत १९९५ पर्यंत प्रॉडक्शन मॅनेजर या पदापर्यंत पोहोचून त्यांच्याच मदतीने स्वतःचा व्यवसाय सुरू केला.

१९९६ साली एक लाख रुपये भांडवल घालून भाड्याच्या जागेत स्वतःचा व्यवसाय सुरू केला आणि आज तो **'एस एम ऑटो स्टॅम्पिंग लिमिटेड'** म्हणून नावारूपाला आलेला आहे. पत्नी सौ. अलका या एम एस ई बी मध्ये नोकरीला असल्यामुळे त्यांच्या सहकार्यानेच हा व्यवसाय सुरू करता आला असे मुकुंद कुलकर्णी आवर्जून नमूद करतात. कंपनीत सुरुवातीपासूनच श्री. एस. जी. फेगडे भागीदार आहेत. २०१४ साली पत्नी सौ अलका यांनी नोकरी सोडून याच व्यवसायात फायनान्स अकौंटस डायरेक्टर म्हणून प्रवेश केला आहे. आज व्यवसायाची वृद्धी झाली आहे. कंपनीचे वेगवेगळी पाच युनिट्स आहेत. साधारणपणे ५०० कामगार काम करतात. कंपनी एकत्र कुटुंब पद्धतीप्रमाणे चालवली जाते. कामगारांची कोणतीही तक्रार नाही. आज रोजी कंपनीची उलाढाल १०० कोटीपर्यंत पोहोचली आहे. दोन वर्षांपूर्वी कंपनीचा आयपीओ आला होता. आता कंपनी पब्लिक लिमिटेड झाली आहे. ब्राह्मण सभा नाशिक रोड तसेच देशस्थ ऋग्वेदी नाशिक या संस्थांची कामे देखील श्री. मुकुंदराव करीत आहेत. संस्थेचे चार मजली इमारतीचे काम सुरू आहे. दोन मजल्यावर विद्यार्थी वसतिगृह व दोन मजले ज्येष्ठ नागरिक यांचेसाठी असावे असे त्यांचे प्रयोजन आहे. २०१५ मध्ये संस्थेची ऋग्वेद बिल्डिंग पूर्णत्वास नेलेली आहे. ब्राह्मण समाजासाठी ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल संस्था स्थापन करण्यात देखील मुकुंदराव कुलकर्णी यांचा हातभार लागला आहे. ही संस्था म्हणजे मुकुंदराव आणि देशस्थ ऋग्वेदी संस्था नाशिक यांनीच लावलेले रोपटे आहे. ही संस्था ब्राह्मण समाजासाठी आजही जोरात काम करीत आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मुकुंद कुलकर्णी यांनी यशाचे शिखर गाठत असताना स्वतःच्या समाज बांधवांना ते विसरले नाहीत.

अनेक पुरस्कार देखील श्री मुकुंद कुलकर्णी यांना मिळालेले आहेत. निमा नाशिक तर्फे नाशिक इंडस्ट्री मॅन्युफॅक्चरर असोसिएन तर्फे **निमा एक्सलन्स पुरस्कार**, दिल्ली उद्योग फोरमतर्फे **उद्योग भारती पुरस्कार**, देशस्थ ऋग्वेदी संस्था नाशिकतर्फे **जीवनगौरव पुरस्कार**, कांचीकोटी शंकराचार्याच्या हस्ते **ब्रह्मरत्न पुरस्कार**, अखिल भारतीय ब्राह्मण संस्थेतर्फे **समाजरत्न पुरस्कार**, अशा अनेक पुरस्काराने श्री. मुकुंद कुलकर्णी यांना गौरविले आहे. त्यांची दोनही मुले अजिंक्य व आदित्य यांचे स्वतंत्र व्यवसाय आहेत आणि ते देखील यशस्वी व्यावसायिक म्हणून ओळखले जातात. ब्राह्मण समाजातील तरुणांनी उद्योग व्यवसाय करावा व यशस्वी व्हावे असे आवर्जून कुलकर्णी सांगतात. **ऋग्वेद भूषण** श्री. मुकुंदराव कुलकर्णी यांना भावी यशस्वी वाटचालीस आणि करीत असलेल्या समाजकार्यास खूप खूप शुभेच्छा!

**शब्दांकन : मिलिंद सरदेशमुख**



*With*
*Best*
*Compliments*
*From*

S E

# SANGRAM ENTERPRISES

**PHARMACEUTICAL DISTRIBUTORS**

**VILAS JOSHI I SANGRAM JOSHI I SOUMITRA JOSHI**

**: Office :**
Apollo, A-3, Basement,
Bajiprabhu Deshpande Marg,
Vishnu Nagar, Naupada,
Thane (West) 400602
Tel. : 25408561 / 25408565

MRH

painttech
CONSULTANTS



Generations Changes BUT HULYALKAR
Technology SAME

**Mukund R. Hulyalkar**

Visits:
**By Appointment Only**
Available on Phone
9.00 a.m. to 6.00 p.m. (For local)
10.30 p.m. to 11.30 p.m. (For outstation)

**Acrylic Distemper**
**2**
**Zinc Silicate**

**Complete Paint World**
**"Choice of Bright People"**

NATIONALIST CONGRESS PARTY
**Mukund R. Hulyalkar — Paint Technologist**
Vice-President: South Central Mumbai Dist

| | | |
|---|---|---|
| **Hon. Editor** | : | Paint India |
| ***Secretary*** | : | Karnataka Progressive Education Society, Mahim, Mumbai |
| **President** | : | Deshastha Rugvedi Brahman Sangha, Dadar |
| ***I P President*** | | Colour Society U.D.C.T. Mumbai |
| ***Patron Member*** | : | Winner's Academy - Thane |
| ***Member*** | : | BIS Committee CHD 20, New Delhi |
| ***Award*** | : | ISSPA Mitra Award (2012) |
| | | Udyogshree By Maharashtra State Government |

Govindashram, (Near Hari Niwas), 224, L. J. Road, Dadar, Mumbai 400 028.
Mobile: 9821099494 • Tel.: 022-24456214 • Fax.: 022-24314865
E-mail: painttech_con@yahoo.com • Website: www.painttechconsultants.com

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

।। संहति : कार्यसाधिका ।।

# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ



## रौप्य महोत्सवी अधिवेशन / परिषद

## बडोदा (गुजरात)

**चला एकत्र येऊया आपली संस्कृती जपूया !**

**दिनांक १२ व १३ नोव्हेंबर २०२२**

**स्थळ : श्री दादा भगवान तीर्थक्षेत्र, केलनपुरी, डभोई रोड, वडोदरा ३९०००४ (गुजरात)**

---

**अध्यक्ष - श्री. विलास जोशी**   **कार्याध्यक्ष - श्री. प्रभाकर कुलकर्णी**

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष (वडोदरा) - श्री. नितीन शहापुरकर**

**देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ, वडोदरा**

---

**मुख्य कार्यालय** - लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहिम, मुंबई - ४०००१६
दूरध्वनी : २४३०२२७३ / २४३०७५७६ - Email: aadram@gmail.com

**बडोदा कार्यालय** - **देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ,** द्वारा उमेश अरविंद सुरतकर, "सोना" बदामडीबागे समोर, शंकर टेकडी, दांडीया बाजार, वडोदरा - ३९०००१ - दूरध्वनी : ९७१२६९२९७३ - Email: milind_tattoo@yahoo.co.in

मुद्रक, प्रकाशक आणि संपादक **श्री. प्रभाकर अनंत संत** यांनी **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळा**च्या वतीने गुरुकृपा, शॉप नं. ३, रोझरी बिल्डिंग, एम.एम.सी मार्ग, माहीम (पश्चिम), ४०० ०१६, येथे छापून **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ,** लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहिम, मुंबई - ४०० ०१६ येथून अंक प्रकाशित केला. संपादक **श्री. प्रभाकर अनंत संत**